समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक: १६९५
दिनांक: ०९/०९/२०२५

# प्रेस नोट

दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत ज्या शहराची लोकसंख्या एक लाखापेक्षा जास्त असेल तसेच जे शहर जिल्हा मुख्यालय आहे अशा शहरात किमान एक शहर उपजीविका केंद्राची (City Livelihood Center) स्थापन करणेबाबत शासनाचे आदेश आहेत. शहरातील गरीब कुटुंबातील सदस्यानी तसेच स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी शहर उपजीविका केंद्र सुरू करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत . त्या अनुषंगाने समाज विकास विभाग अंतर्गत स्वयंसहाय्यता महिला बचत गटानी उत्पादित वस्तूंचे विक्री केंद्र व इतर सेवा पुरविणेकरीता शहर उपजीविका केंद्र (CLC) सिहंगड रस्ता, पु.ल. देशपांडे उद्यानाजवळ, पुणे येथे मनपाच्या आधार केंद्रामध्ये दि. ३/१०/२०२४ पासून सुरू करणेत आले आहे.

शहरातील सर्व नागरिकांना,कंपन्या तसेच सामाजिक राजकीय क्षेत्रातील सर्वाना या प्रसिद्धी पत्रकाद्वारे आवाहन करण्यात येते कि आगामी सणासुदीच्या हंगामासाठी आपल्या शहरातील महिला बचत गटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तू ,खाद्यपदार्थ,फराळाचे पदार्थ गिफ्ट ,घरातील शोभेच्या व दैनदिन बाबतच्या आकर्षक वस्तू व साहित्य इत्यादी शहर उपजीविका केंद्र (CLC) सिहंगड रस्ता, पु.ल. देशपांडे उद्यानाजवळ, पुणे येथे मनपाच्या आधार केंद्रामधून खरेदी करावेत .तसेच ज्या नागरिकांना सदर ठिकाणी जाणे शक्य होणार नाही. त्यांनी घरी बसल्या anuemart.com या ऑनलाईन पोर्टल द्वारे सुद्धाऑर्डर नोंदवून खरेदी करता येऊ शकेल. बचत गटातील महिलांना सक्ष्मी करणासाठी शहरातील सर्वांनी हातभार लावावा अशी विनंती करण्यात येत आहे .

संपर्क शहर उपजीविका केंद्र ९८३४९६४९९३

anuemart.com

(रामदास चव्हाण)
मुख्य समाज विकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

(अरविंद माळी)
उपायुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका